**//४//**

**प्रतिवादी क्र.३ तर्फे श्री.व्ही.एम.उप्पे वकिल यांच्यामार्फत उलटतपास सुरु.**

**०७.** १९७५ साली माझे लग्न झाले. माझे गाव संगमवाडी, ता.कंधार, जि.नांदेड व प्रतिवादींचे गाव उमरदरा, ता. जळकोट हे आहे. या गावात साधारण ४० किमीचे अंतर आहे. प्रतिवादी क्र.५ च्या बायकोचे नाव मला आठवत नाही. हे खरे की, प्रतिवादी क्र.५ ची पत्नी व माझी पत्नी कुसूम या सख्ख्या बहिणी आहेत. मी वादी, प्रतिवादींना ओळखतो. प्रतिवादींच्या घरी सण-समारंभ व दु:खद घटनांच्या वेळेला माझे जाणे-येणे असते.

**०८.** वादींचे विवाह कधी झाले हे मला माहिती नाही.हे खरे की, वादींच्या घरी सण-समारंभ व दु:खद घटनांच्या वेळेला माझे जाणे-येणे असते. हे खरे की, वादींच्या सासरची परिस्थिती चांगली आहे. वादींच्या सासरी त्यांना लग्न झाल्यापासून काही त्रास नाही याची मला माहिती नाही. हे खरे की, वादी आपआपल्या सासरी नांदतात. हे खरे की, वादी, प्रतिवादी आपआपले सण-समारंभ वेगवेगळे साजरे करतात. प्रतिवादी क्र.५ यांच्याकडे मी जात-येत असतो. त्यांच्याकडे गेल्यानंतर ते मला इतर प्रतिवादींच्या घरी घेवून जातात.

**०९.** माझ्या वडिलांना वडिलोपार्जित १२ एकर जमीन आहे. मला तीन भाऊ व दोन बहिणी आहेत. शेकापुर आणि संगमवाडी, ता. कंधारमध्ये आमच्या जमिनी आहेत. वडिलोपार्जित जमिनीतील वाटणीमध्ये मला ३ एकर जमीन वाटणीला आली आहे. आमच्या बहिणीला या वाटपात हिस्सा दिलेला नाही.

**१०.** दावा मिळकतीचे नमूना ७/१२ उतारे मी पाहिले आहेत. होकर्णा पाझर तलावासाठी नेमकी कोणत्या वर्षी जमीन संपादीत झाली, हे मला सांगता येत नाही. हे खरे की, संपादनाची प्रक्रिया कधी सुरु झाली व कधी संपली हे मला सांगता येत नाही. संपादनाचा निवाडा कधी झाला हे मला माहित नाही. त्यामध्ये कोणा-कोणांची जमीन संपादीत झाली, हे मला सांगता येत नाही. ७/१२ ज्याच्या नावे आहे, त्याच्या नावे ते संपादन झाले या प्रश्नांस माझे उत्तर की, तसे ते झाले असावे. साक्षीस येण्यापुर्वी दाव्याची माहिती मी घेतली आहे.

**११.** प्रतिवादी क्र.५ च्या नावे किती शेत जमीन आहे, हे मला माहिती

नाही. त्याला कशाच्या आधारे जमीन आली हे मला माहिती नाही. गट क्र.११० व ११२ मध्ये प्रतिवादी क्र.५ च्या नावे जमीन आहे, हे मला माहिती नाही. हे खरे की, रामराव, गुणाजी, सिताराम, सदाशीव, विठ्ठल यांच्या चुली वेगवेगळया आहेत. मागील २०-२५ वर्षांपासून ते वेगवेगळे राहतात याची मला माहिती आहे. हे खरे की, प्रत्येकाचे रेशनकार्ड वेगवेगळे आहेत. हे खरे की, प्रत्येकाचे घर वेगवेगळे आहेत. हे खरे की, प्रतिवादी क्र.५ हा १९८६ सालापासून वेगळा राहतो. संपादनाच्या निवाडयात वादींची नावे नाहीत हे खरे आहे. संपादनाच्या निवाडयात ज्याच्या नावे रक्कम आली, त्याने ती घेतली याबद्दल मला माहिती नाही. फेरफार क्र.२७६ मंजूर झाल्यापासून प्रतिवादी वेगवेगळे राहतात याची मला माहिती नाही. हे खरे की, तो फेरफार कधी मंजूर झाला व कशा संदर्भाने मंजूर झाला याची मला माहिती नाही. खरेदीपत्र क्र.४१०/२०२१, २०९/२००८ बद्दल मला माहिती नाही. हे खरे की, त्यातील पक्षकारांची मला माहिती नाही. हे खरे की, त्या खरेदीपत्राला मी हजर नव्हतो व त्यावर माझी सही नाही. प्रतिवादी क्र.५ च्या सांगण्यावरुन मी सरतपास परिच्छेद क्र.५ मधील मजकुर लिहिला आहे. रामरावने आपल्या दोन्ही सुनांच्या नावे जमीन विक्री केली. हे खरे की, रामराव यांचे वय आजरोजी साधारण ९५ वर्षाहून जास्त आहे. हे खरे की, त्यांना कोणतीही कामे सुधरत नाहीत. हे खरे की, प्रतिवादी क्र.४ रामरावचा सांभाळ करतात. रामरावला दमा आहे हे मला माहित नाही. होकर्णा तलावाच्या संपादनाची रक्कम वादींना मिळाली नाही असे मी प्रतिवादी क्र.५ आणि वादी यांच्या सांगण्यावरुन लिहिले. १९८६ साली झालेल्या वाटणीनूसार रामराव, विठ्ठल, गुणाजी आणि सिताराम वेगवेगळे राहतात याची मला माहिती नाही. हे खरे की, रामराव स्वत: शेतीची कामे करु शकत नाही.

**१२.** फेरफार क्र.२७६ च्या आधाराने प्रतिवादी क्र.५ च्या नावे वेगळा ७/१२ उतारा तयार झाला याची मला माहिती नाही. वादींच्या मुलां-मुलींची लग्ने झाली आहेत यास माझे सांगणे की, काहींची झाले आहेत काहींची नाहीत. प्रतिवादी यांचे वादींच्या घरी सण-समारंभाला जाणे-येणे आहे याची मला माहिती नाही. मी

वादींच्या घरातील ज्या लग्नाला गेलो, त्या लग्नात रामराव हजर होते बाकीचे प्रतिवादी मला दिसले नाहीत. प्रतिवादी वादींचे माहेरपण करीत होते यास माझे सांगणे की, हा दावा झाल्यापासून ते बंद झाले आहे.

**१३.** प्रत्येक प्रतिवादींचा बैल-बारदाणा वेगवेगळा आहे, याची मला माहिती नाही. हे खरे की, रामरावला जमीन करणे होत नाही म्हणून त्याने जमीन विकली. वादींसोबत मी कोणत्याही प्रतिवादींकडे गेलो नाही. हे खरे की, प्रतिवादींच्या नावे मंजूर झालेल्या फेरफारांची मला माहिती नाही. हे खरे की, दाव्यातील कोणत्या जमिनी कोणी कोणाला विकल्या, का विकल्या त्यावर साक्षीदार कोण आहेत, याची मला माहिती नाही. हे खरे नाही की, वादीं व प्रतिवादी क्र.५ यांच्या सांगण्याप्रमाणे मी माझ्या शपथपत्रातील मजकूर लिहिला. हे खरे नाही की, आजरोजी मी त्यांच्याच सांगण्यावरुन साक्षीला आलो. हे खरे की, प्रतिवादी क्र.८ आणि ९ च्या नावे झालेल्या खरेदीपत्राच्या आधारे झालेल्या फेरफाराचा मजकुर मला माहिती नाही. हे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, शपथपत्रातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला नाही.

प्रतिवादी क्र.३ साठी उलटतपास पुर्ण.

**प्रतिवादी क्र.४, ६, ७तर्फे वकिलांचा पुकारा केला असता ते गैरहजर. सबब, त्यांच्याविरुध्द उलटतपास नाहीचा आदेश करण्यात येतो.**

**प्रतिवादी क्र.५ तर्फे कैफीयत दाखल नाही. उलटतपास घेणार नसल्याचे त्यांनी तोंडी सांगितले.**

**प्रतिवादी क्र.८ व ९ यांनी प्रतिवादी क्र.३ यांचा उलटतपास स्वीकारला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक: १७/११/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**